प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com



नाशिक : इंटर्नशिपसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत त्यांचे पालक व महाविद्यालयाचे विभागप्रमुख, प्राध्यापक.

# 'के. के. वाघ'च्या आठ विद्यार्थ्यांना दुबईत इंटर्नशिप

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांना दुबईतील फाइव्ह होल्डिंग कंपनीमध्ये इंटर्नशिप करण्याची संधी मिळाली आहे. हा कालावधी एक महिन्याचा असून, प्रशिक्षणार्थींना त्याचे मानधन दिले जाणार आहे.

दरम्यान, इंटर्नशिपसाठी निवड झालेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार संस्थेतर्फे करण्यात आला. तांत्रिक कौशल्य व जीवन कौशल्याबरोबरच दुबईतील 'उद्योग जगतातील कार्य संस्कृती'चा अनुभव विद्यार्थ्यांना घेता येणार आहे, असे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. प्रमोद शहाबादकर यांनी यावेळी सांगितले. अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची दुबईमध्ये इंटर्नशिपला जाणारी दुसरी बॅच आहे. अधिष्ठाता डॉ. एस. वाय कुटे, विभागप्रमुख डॉ. प्रीती भामरे, डॉ. डी. एम. चांदवडकर, डॉ. एस. एम. कमलापूर, डॉ. पी. बी. कुशारे व डॉ. प्रमोद शहाबादकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष समीर वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Nashik Edition
Feb 10, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com